सकाळ | परभणी शुक्रवार । ८ ऑक्टोबर । २०१०

TODAY



परभणी : होमिओपॅथिक अकॅडमी ऑफ रिसर्च अँड चॅरिटीज्‌च्या वतीने एचआयव्ही बाधित मुलांना साहित्याचे वाटप करण्यात आले. या वेळी डॉ. ए. एल. शेळके, ॲड. एम. के. उबाळे, ॲड. अशोक सोनी, ॲड. पवन चांडक, विशाल तोष्णीवाल उपस्थित होते.

# एचआयव्ही बाधित मुलांना शिक्षणाची संधी मिळणार

परभणी, ता. ७ (बातमीदार) : एचआयव्ही बाधित मुलांना शिक्षण देण्याबरोबरच त्यांच्यावर संस्कार करण्याची जबाबदारी येथील होमिओपॅथिक अकॅडमी ऑफ रिसर्च अँड चॅरिटीज्‌ने घेतली आहे.

जीवनरेखा बालगृहात या संस्थेच्या वतीने एचआयव्ही बाधित मुलांना साहित्य वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला. अध्यक्षस्थानी जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ॲड. अशोक सोनी होते. डॉ. ए. एल. शेळके, ॲड. एम. के. उबाळे यांची प्रमुख उपस्थिती होती. संस्थेचे अध्यक्ष डॉ. पवन चांडक यांनी जुलै २००८ पासून होमिओपॅथिक अकॅडमीने एचआयव्ही बाधित मुलांची मोफत आरोग्य तपासणी, मोफत होमिओपॅथी उपचार केले आहेत. दिवाळीनिमित्त त्यांना मिठाई, भेटवस्तू, कपडे यासह शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले आहे. पोषण आहारासह ब्लँकेट, सतरंजी, फळे यांचेही वाटप करण्यात आले. बालदिनी विविध कार्यक्रम घेऊन या मुलांसाठी पुढाकार घेतला आहे, असे नमूद करीत 'प्रतिसाद' या चित्रपटाचे चॅरिटीज्‌ शोमधून जमा झालेल्या निधीतून त्यांना जमिनीवर झोपण्याऐवजी बेडची व्यवस्था करून देण्यात येत आहे, असे त्यांनी सांगितले. या मुलांना शिक्षण उपलब्ध करून देतानाच त्यांच्यावर सुसंस्कार घडविण्याचे कामही संस्था करीत असल्याचे सांगितले. डॉ. शेळके यांनी सत्यसाई सेवा समिती या मुलांवर बालसंस्कार करणार असल्याचे सांगितले. ॲड. सोनी यांनी या मुलांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्याची ग्वाही दिली. या वेळी ॲड. बी. ए. मोदाणी, सत्यनारायण चांडक, बजाज, डॉ. दरक, डॉ. श्वेता केंद्रेकर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमासाठी विजय तापडिया, विशाल तोष्णीवाल, राहुल पतंगे, डॉ. निखिल केंद्रेकर, ॲड. मानधने, वर्षा कालानी, पुरण अग्रवाल, ॲड. राजगोपाल मानधने यांनी पुढाकार घेतला.